PUBLICATION - PRABHAT
DATE - OCTOBER 04, 2019
PAGE NO. - 5

100% PUBLIC RELATIONS

# आयुष्यात कोणालाही भीक देऊ नका

## डॉ. सोनावणे : हिंदू महिला सभेतर्फे पूजा घनसरवाड यांचा 'दुर्गा पुरस्कारा'ने गौरव

पुणे, दि. ३ - आयुष्यात कोणालाही भीक देऊ नका; पण मदत मात्र नक्की करा. भीक देणे म्हणजे समोरच्याला आपल्यावर अवलंबून ठेवणे आणि मदत करणे म्हणजे स्वावलंबी बनवणे. भिकारी वाढतात किंवा भीक मागतात याला भीक देणारेच उपाय करू शकतात. भीक देणे बंद केले तरच ते पोटापाण्यासाठी पर्याय शोधतील म्हणूनच भीक देऊन परावलंबी करण्यापेक्षा मदत करून स्वावलंबी बनवा, असे आवाहन भिक्षेकरींचे डॉक्टर म्हणून ओळखले जाणारे आणि 'सोहम ट्रस्ट'चे डॉ. अभिजित सोनावणे यांनी बुधवारी केले.

हिंदू महिला सभेच्यावतीने आयोजित नवरात्र महोत्सवात यंदाच्या तिसऱ्या 'दुर्गा पुरस्कारा'ने स्मशानात जळणाऱ्या चितेच्या प्रकाशात अभ्यास करून दहावीत घवघवीत यश पटकावणाऱ्या पूजा घनसरवाड यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. सोनावणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले, सोनावणे यांच्या पत्नी डॉ. मनीषा सोनावणे, गुरुनाथ ट्रॅव्हलच्या रोहिणी नामजोशी पांढरे, कथाकथनकार वसुधा मेहंदळे आदी उपस्थित होते. या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यावेळी शहीद जवानांच्या तीन मुलींचे कुमारिका पूजन करण्यात आले.

माझे कुटुंब स्मशानात प्रेताच्या अंत्यविधीसाठी आलेल्यांना लाकूड, पाणी आदी वस्तू पुरवण्याचे काम करत. आई-वडील अशिक्षित आहेत. वडिलांना थोडी अक्षर ओळख असल्याने त्यांना आम्हा मुलांना शिकवून मोठे करण्याची दृढ इच्छा होती. पालक शिक्षित नसले तरी, संस्कार, संस्कृती जपण्यास त्यांनी आम्हाला शिकवले. आई सुया, फुगे, पिना विकायची. शाळेतली मुली चिडवायची; पण मला लाज वाटायची नाही कारण आम्ही मेहनतीचेच खात होतो. आमच्या समाजात कोणी शिकत नाही;पण आम्ही पाचही भावंड शिकत आहोत. मी आज डी फार्मसी केले आहे. कारण माझे वडील कायम म्हणतात जे आहे त्यावर रडण्यापेक्षा त्यातून मोठे होण्याचा प्रयत्न करा, असे पूजा घनसरवाड यांनी सांगितले. देवाला वाटून दिलेल्या वारांप्रमाणे त्या-त्या मंदिरांबाहेर बसलेल्या भिक्षेकरूंची

> चिता जाळायला येणारे लोक त्या मृत व्यक्तीच्या चांगल्या गोष्टीला आठवत. म्हणून आपण कायम चांगले काम करायचे हे फार लवकर समजले. परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे.
>
> पूजा घनसरवाड

डॉ. सोनावणे हे सुश्रुषा ते करतात. त्यांच्या या कुटुंबात ११०० लोक आहेत असे ते सांगतात. १४ मुले भीक मागणे सोडून शिक्षण घेत आहेत. ५७ भिकाऱ्यांना भीक मागण्यापासून परावृत्त करून व्यवसाय सुरू करून दिले आहेत.